REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2025

# बंजारा समाजः संस्कार लोकगीत

प्रा. यशदीप शंकराव राठोड
संशोधक विद्यार्थी इतिहास विभाग
संत ज्ञानोपासक महाविद्यालय संशोधन केंद्र, परभणी ता.जि.परभणी.

डॉ. भालेराव जी. पी.
संशोधक मार्गदर्शक
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली.



प्राचीन काळापासुन व्यक्तीसमोर पुरूषार्थ साधनेच उद्दीष्टे ठेवले जाते त्यासाठी अंगभूत गुणांचा यथोचित उपयोग झाला पाहिजे या दृष्टीने भारतीय संस्कृतीत विविध संस्काराच्या मागे धार्मीक श्रध्दा प्रबळ होती तरी त्यांचा सामाजिक आशय लपून राहत नाही. सामाजिक संस्थाचा योगक्षेम व्यवस्थीत चालावा म्हणून कुटुंबातच धार्मिक विधींच्या स्वरूपात संस्कार केले जात असत. संस्कार संपन्न व्यक्ती सुरक्षित समाजाला सातत्याने मिळत राहवा हा दृष्टीकोन असावा. जी क्रिया केली असता एखादी व्यक्ती विशिष्ट कार्याला उपयुक्त ठरते. ती क्रिया म्हणजे संस्कार होय. संस्काराची संख्या 48 पासून 16 संस्कारापर्यंत सांगण्यात येते. काही संस्कार कालबाहय ठरले, काहींमध्ये कालानुरूप् बदल घडले आहेत. काही संस्कार शाश्वत, स्थलकालातील स्वरूपाचे आहेत. भारतीय संस्कृती कोशामध्ये 16 संस्काराची यादी दिली आहे. गर्भाधान, पुंसवन, सीमंयोन्नयन, जात कर्म, नामकारण, निष्क्रमण, अन्नप्राशन, चौल-चूडाकर्म, उपनयन, मेघाजनन, महानाम्नी, व्रत, महाव्रत, उपनिषद व्रत, समावर्तन, अत्येंन्टी या सारखे संस्कार कालौघात लुप्त झाले.

बंजारा समाज जन्म व विवाह संस्कार अत्याधिक उल्हासाने साजरे करतात. मुळातच हिंदु धर्मामध्ये संस्काराला पराकोटीचे महत्वपुर्ण स्थान पाहावयास मिळते.

**उद्दीष्टेः**

1. **बंजारा समाजातील लोकगीताचे अध्ययन करणे.**
2. **संस्कारनुरूप लोकगीत गायले जातात त्याचा अर्थ जाणून घेणे.**
3. **संस्काराविषयी माहिती संकलीत करणे.**

**गृहीतकेः**

1. **बंजारा समाज संस्कारक्षम आहे.**
2. **संस्कार विधी प्रसंगी लोकगीते गायली जातात.**
3. **सर्व बंजारा समाज तांडयामध्ये बिना शास्त्रीय विधी पासून जन्म ते मृत्यू पर्यंत संस्कार संपन्न करतात.**

**1) गर्भाधान:- नवविवाहीत दाम्पत्य यज्ञ विधी करून विविध देवदेवतांची मनोभावे प्रार्थना करून गर्भस्थापनेला सहय करावे अशी विनंती करतात.**

**बाई ये कसो तो वेरोच मारे जीवडान। काई खायेन दू बाई मोरे जीवडान।**
**आमली सारू जीवनं खींचाव बाई। खेतेती अंबा तोड लानी ये भौजाई।**
**खाटो-खाटो खावु वाटरो मारे जीवडान।**

**बाळ नऊ महीने गर्भात असते परंतू अशा परिस्थतीत संस्कार केले जातात.**

**2) प्रसव (प्रसूती):- बंजारा समाजात प्रसूतीला जणणो म्हणून संबोधतात. हिंदू धर्मात पुत्रप्राप्तीसाठी पुंसवन संस्कार महत्वाचा आहे. स्त्री आपली स्त्रीत्वाची सीमा ओलांडून मातृत्वाकडे वाटचाल करते या काळात तिला लागणारे डोहाळे पुरविले जातात. गर्भधारणेच्या दुस-या महिन्यापासून आठव्या महिन्यापर्यंत तो करण्याची प्रथा आहे. गर्भरक्षण व्हावे हा संस्कारामागील भूमीका आहे. बंजारा समाजात बाळांतपण स्त्रीचा पुर्नजन्म मानला जातो.**

**3) डाईसाळ:- बाळांतपणामध्ये मदत करणारी स्त्री म्हणजे डाईसाळ, वयोवृध्द सहायक स्त्रीला दायमाता संबोधले जाते. दायमातेला येण्यासाठी वेगवेगळे प्रलोभणे मांडून तीची मदत घेतली जाते.**

**डाई मार याडी चाल झपको घरेन। तोन रूपेरो हांसलो दरा दियूं।**
**तोन ज्यार गंहू दियूं। तोन याडी पामडी दरा दियूं।**

**4) थाळी नंगारा वजाळो:-** स्त्रीने मुलाला जन्म दिला असेल तर तांडयाच्या मध्यभागी जाऊन नंगारा वाजविला जात असे आणि मुलीने जन्म दिला तर थाळी वाजविली जात असे. हा समाचार दाय माता सांगत असे.

पेल मडाये नामे मारी धरतीरो लेस्या। धरतीरो जावे तळ नीपजो ये।
दुसरो मडाये नामे मारे मेलीयारो लेस्या। मेलीयारो जावे तळ नीपजो ये।।

**5) नाळो काटळो:-** बाळांतपणा नंतर नाळ कापणे हा देखील एक संस्कार बंजारा समाजात पाहावयास मिळतो. नाळ व रक्त खडाकडून पुसले जाते. शिशुला आंघोळ घालण्यापूर्वी मालिश केली जाते. या विधी नंतर स्तनपान करण्यास सुरूवात केली जाते. अशा प्रसंगी स्त्री काही गाणे गातात ती अशा प्रकारे

याडी बाप दीने जनम
नव मीना नव दाड घाली पेटे में
बाळा सो जोरे।

**6) लापसी:-** बाळांतपणानंतर दिलेल्या पदार्थात लापसीचा समावेश असतो. गव्हाचे पीठ भाजून तूप घालून लापसी तयार केली जाते. त्यात ड्रायफ्रुटस् टाकले जातात. तब्येत लवकरात लवकर व्यवस्थीत व्हावी यासाठी हा पदार्थ अवर्जुन खावू घातला जात असे. स्त्री लापसी करण्यात तरबेज असतात.

बाईये लापसी मा टोपरो घाली काई?
बाईये लापसी मा बादाम घाली काई?
बाईये लापसी मा काजू घाली काई?
बाईये लापसी मा इलायची घाली काई?

**7) नातरो:-** बंजारा समाजात नातरो नामक विधी केला जातो. त्यानुसार बाळाची स्तुती केली जाते. त्यासाठी लोकगीत गायले जातात. बाळाकडे पाहून गाणे गायली जातात.

हाटडिया मत जाजो भाटन ये
भाटन भोली खेलन ये
हाटेर वाटेपर, तो पर वेडो घालो ये।

**8) उळवा धकाणे:-** उपरोक्त विधी महत्वपूर्ण मानला जातो, आई बाळाच्या व्दारे अग्नीला नमस्कार केला जातो, अंगणात गड्ढा खोदून त्यात अग्नी प्रज्वलीत केली जाते. पाच विवस्त्र बालकांची मदत

घेतली जाते. लहान मुलाच्या मदतीने आईच्या डोक्यावर पाण्याचा घडा ठेवला जातो. अग्नी शांत करण्यासाठी पायाच्या अंगठयाने घडा ठकलून दिला जातो. आणि बाळाच्या दिर्घ आयुष्याची कामना केली जाते.

**9) धुंड संस्कार:-** बाळाच्या जन्मा पश्चात येणा-या पहिल्या होळीला हा संस्कार केला जातो. पुरूष मंडळी आनंदाने गाणे गात नाचून आनंद साजरा करतात. या क्षणांची पदोपदी वाट पाहतात, स्त्रीयांचा सहभाग सक्रिय असे. होळीच्या दुस-या दिवशी सुर्योदयाच्या पुर्व होळीचे दर्शन बाळाला व्हावे ही मनोमन इच्छा असते. स्त्री पुरूष एकत्र येत बाळाला आर्शिवाद देतात.

चरीक चरीया चम्पा ढोल
जू जू चराये ले रोला।
पेलो बेटा नाईकी करीये
दूसरो बेटा कारभार करीये।
तीसरो बेटा खादू चराये
चौथों बेटा घोड चराये।
पांचवो बेटा छेळी चराये
छोवो बेटा मां-बाप पोसीये।

**10) जावळ काडणो:-** बाळाच्या डोक्यावरील केस (जावळ) काढणे हा संस्कार विधी मानला गेला. बाळाला मामाच्या मांडीवर बसून केस कापले जातात. बक-याचा बळी देत नातेवाईकांना भोजनासाठी आमंत्रीत केले जाते अशा प्रकारे लोकगीत गायले जातात.

मामा रो भाळंजो बेसमो गोदे मं
हातेमा खेलना रमरो डोलेमं।
मामारी शिके मानरोये कोई रमरोये।।
मामारो भाळंजो बेसमो गोदे मं
नावी आयो तांडे म कतंळी होतेमं
बाळारे जावळ कोडे नये जरा रमेदो मन
मामारो भाळंजो बेसमो गोदे मं।।

**11) पुनर्जन्मावर विश्वास:-** बंजारा समाज पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात. स्वर्गवासीझालेले पूर्वज पुन्हा घरात जन्म घेतात अशी भावना आहे. आपल्याला वैभव प्राप्त करून देणारा बालक आला या उत्साहात गाणे गातात.

**ढेरो काततो काततो वर आयेस**
**ढेरो कातती कातती पर जायेस।**

**बंजारा समाज आनंदाने संस्कारविधी करीत असतो. भटकंती जीवनामुळे लोकगीतातुन मनोरंजन करण्याची भूमीका होती, संगीत हे शाश्वत आनंद देणारे असल्याने पुर्वापार त्याचा स्विकार केला जातो. लोकगीतातून संस्कारामागील भूमीका त्यातुन मांडली जाते. अपत्य हे निरोगी राहावे यासाठी वेगवेगळया संस्कारातून जावे लागत असे. उपरोक्त संशोधन लेखातुन खालील निष्कर्ष काढले जातात.**

## निष्कर्षः-

1) **संस्कारक्षम बंजारा समाज हा त्यांच्या कृतीतून आढळते.**
2) **मुखोद्गत लोकगीतातुन संस्कारला विशिष्ट दर्जा प्राप्त करून देतात.**
3) **लोकगीतात व्यंग व हास्य असून कोणाची भावना दुखावू नये यांचा विचार केला जातो.**

## संदर्भ ग्रंथः

1. **प्रा. गणपत राठोड- बंजारा लोकगीतांे का सांस्कृतीक अध्ययन**
2. **डॉ. रूखमीन पवार - बंजारा लोकजीवन पध्दती कैलास पब्लीकेशन औ.बाद.**
3. **डॉ. यशवंत जाधव - बंजारा जाती आणि समाज संस्कृती - वाणी प्रकाशन, दिल्ली**
4. **बळीराम पाटील- गोर बंजारे लोकांचा इतिहास, बळीराम पाटील स्मारक समिती, प्रकाशन, यवतमाळ**